वर्षभरात ११५० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन : वर्षभरातील चित्र, कौशल्यानुसार निवड

# विद्यापीठात 'नेतृत्वविकास'चे धडे

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : पदवी, पदव्युत्तर शिक्षणाबरोबरच महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींमधील नेतृत्वविकास साधण्याचे काम शिवाजी विद्यापीठाकडून करण्यात येत आहे. त्याअंतर्गत नेतृत्वविकास केंद्राच्या माध्यमातून गेल्या वर्षभरात कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ११५० विद्यार्थी-विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले आहे.

कोणतेही क्षेत्र असू दे; त्यामध्ये नेतृत्व असणे आवश्यक असते, हे लक्षात घेऊन राजकीय, कला, सामाजिक, शैक्षणिक, आदी विविध क्षेत्रांमध्ये नवे नेतृत्व निर्माण करणे, ज्या विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व करण्याचे कौशल्य आहे, ते अधिक विकसित करणे या उद्देशाने विद्यापीठामध्ये गेल्या वर्षी नेतृत्वविकास केंद्राची सुरुवात केली. विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाच्या अंतर्गत या केंद्राचे काम सध्या सुरु आहे. कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील संलग्नित २९१ महाविद्यालये आणि विद्यापीठातील विविध ३९ अधिविभागांतील विद्यार्थी या केंद्राच्या माध्यमातून नेतृत्वविकासाचे उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यात प्रामुख्याने चार दिवसांच्या निवासी शिबिराच्या माध्यमातून विविध क्षेत्रांतील नामवंत व्यक्तींद्वारे मार्गदर्शन केले जाते. त्याद्वारे आतापर्यंत ११५० जणांना नेतृत्वविकासाचे धडे या केंद्राच्या माध्यमातून दिले आहेत.

## वेगळ्या संकल्पनेवरील केंद्र

विद्यापीठ पातळीवर पहिल्यांदाच अशा वेगळ्या संकल्पनेवरील केंद्र सुरु केले आहे. त्याअंतर्गत राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांना विद्यार्थी-विद्यार्थिनींचा चांगला प्रतिसाद असल्याचे या केंद्राचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी सांगितले.

"या नेतृत्वविकास केंद्राच्या शिबिरात नेतृत्व आणि व्यक्तिमत्त्व विकास,वेळेचे व्यवस्थापन, आयुर्वेद, जैवविविधता अशा विविध विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. त्याचा फायदा मला झाला आहे. सुरुवातीला एखादे काम करताना भीती वाटायची. आता मात्र भीती दूर झाली आहे.

\- सुनील बिरेदार, विद्यार्थी



## असे केले जाते मार्गदर्शन

नेतृत्वविकासाबाबत मार्गदर्शन करण्यासाठी पाचगणी येथील बहाई अकॅडमी येथे चार दिवसांचे निवासी प्रशिक्षण शिबिर घेतले जाते. त्यासाठी संलग्नित महाविद्यालये आणि विद्यापीठातील अधिविभागांना पत्र पाठवून नेतृत्व करण्याचे कौशल्य असलेल्या दोन विद्यार्थी अथवा विद्यार्थिनींची नावे मागविली जातात.

# दूरशिक्षण केंद्र परीक्षा अर्ज भरण्यास प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राच्या विविध अभ्यासक्रमांच्या मार्च-एप्रिल दरम्यान परीक्षेचे अर्ज भरण्याची प्रक्रिया आज, सोमवारपासून सुरु होणार आहे. ऑनलाईन प्रक्रिया असून त्यासाठी विनाविलंब शुल्कासह १८ फेब्रुवारीपर्यंत मुदत आहे. या केंद्रामार्फत सन २०१९-२020 मध्ये बी. ए., बी. कॉम., एम.ए., एम. कॉम., एम. एस्सी (गणित), एमबीए, एम. कॉम. (व्हॅल्युएशन ऑफ रिअल इस्टेट) या अभ्यासक्रमांच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१९ मध्ये झालेल्या परीक्षांचे गुणपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. मार्च-एप्रिलमध्ये होणाऱ्या परीक्षांसाठी अर्ज भरण्यास सोमवारपासून प्रारंभ होणार आहे. त्यात विनाविलंब शुल्कासह १८ फेब्रुवारी, तर विलंब शुल्कासह १९ ते २४ फेब्रुवारी, अतिविलंब शुल्कासह २५ ते २९ फेब्रुवारीपर्यंत मुदत आहे.

अमित गद्रे



जागतिक सूर्यनमस्कार दिन व रथसप्तमीनिमित्त शिवाजी विद्यापीठ व राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे आयोजित सामुदायिक सूर्यनमस्कार उपक्रमात सहभागी योग साधक महिला.

# शिव सूर्यनमस्कार महायज्ञ

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठ-राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे आयोजन

जागतिक सूर्यनमस्कार दिन आणि रथसप्तमीनिमित्त शिवाजी विद्यापीठाचा आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, योग विद्याधाम, पतंजली योग विद्यापीठ, कणेरी येथील सिद्धगिरी मठ आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिव सूर्यनमस्कार महायज्ञ' या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रविवारी सकाळी साडेसहा वाजता शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर सूर्यनमस्कार महायज्ञ उपक्रम झाला.

या सामुदायिक सूर्यनमस्कार महायज्ञात ५०० हून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनी, नागरिक व योगसाधकांनी सहभाग घेतला. उपक्रमाचे प्रमुख वक्ते, आयुष मंत्रालय समिती सदस्य आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शहर संघचालक डॉ. सूर्यकिरण वाघ यांनी योग, सूर्यनमस्कार आणि आयुर्वेदाचे जीवनातील महत्व याविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर सूर्यमंत्रोच्चारासोबत सूर्यनमस्काराचे सामुदायिक प्रात्यक्षिक आणि निसर्गध्यान करण्यात आले. योगशिक्षक दत्ता पाटील यांनी निवेदन केले. कौशिक पाध्ये यांच्या 'वंदे मातरम्' या गीताने उपक्रमाचा समारोप झाला. वीणा मालदीकर, प्रीती चव्हाण, डॉ. श्वेता पाटील, उज्वला डफळे, रमेश धाकरस, प्रकाश पाटील, चंद्रशेखर खापणे, सूरज पाटील, उदय घाटे व प्रज्योत जोशी या योगशिक्षकांचे सहकार्य लाभले.

# नॅनो टेक्नॉलॉजीच्या वापरामुळे जगणे सुसह्य होईल : प्रा. पाटील

## सायबर महाविद्यालयात आनंद ग्रंथोत्सवाचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आधुनिक युगात प्रत्येक माणसाला कमी मोबदल्यात आधुनिक सुख-सुविधांची गरज भासते आहे. या अपेक्षित गोष्टी नॅनो टेक्नॉलॉजीच्या वापरामुळे शक्य होतील व जगणे सुसह्य होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

सायबर महाविद्यालयात आयोजित आनंद ग्रंथोत्सवाचे उद्घाटन झाले. यावेळी '२१ व्या शतक व नॅनोटेक्नॉलॉजी' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. व्ही. एम. हिलगे होते. डॉ. पाटील म्हणाले, विकसित देशात मोठ्या प्रमाणात नॅनो टेक्नॉलॉजीवर आधारित संशोधनासाठी खर्च व गुंतवणूक केली जात आहे. बदलत्या काळानुरूप तंत्रज्ञान विकसित करण्यावर त्यांचा भर आहे. भारतात नॅनो टेक्नॉलॉजीच्या वापरास व संशोधनास गती मिळत असून शिवाजी विद्यापीठात यावर काम सुरू आहे.



**कोल्हापूर : सायबर महाविद्यालयात आयोजित आनंद ग्रंथोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. पी. एस. पाटील. डॉ. व्ही. एम हिलगे, प्राचार्य ए. आर. कुलकर्णी, प्रदीप वायचळ आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

यावेळी सायबरचे संचालक डॉ. प्रदीप वायचळ, सुनील शिंदे, डॉ. बाबू झकेरिया, डी. टी. विचारे, प्राचार्य ए. आर. कुलकर्णी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. कृष्णात चौगले यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सरेश आपटे यांनी केले. डॉ अजय शिंदे यांनी आभार मानले. सकाळच्या सत्रात आनंद ग्रंथोत्सवाचे उद्घाटन झाले. प्रदर्शनात ३० हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुस्तक प्रकाशकांची पुस्तके सवलतीच्या दरात उपलब्ध आहेत. ४ फेब्रुवारीपर्यंत हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले राहणार आहे.

# सामुदायिक सूर्यनमस्कारातून निसर्गाचे ध्यान

## विद्यापीठातील कार्यक्रमात ५०० हून अधिक विद्यार्थी, योगसाधकांचा सहभाग

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात सामुदायिक सूर्यनमस्कार यज्ञ करण्यात आला. सूर्य मंत्रोच्चारासोबत सूर्यनमस्काराचे सामुदायिक प्रात्यक्षिक व निसर्गध्यान करण्यात आले.

जागतिक सूर्यनमस्कार दिनाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, योग विद्याधाम, पतंजली योग विद्यापीठ, कणेरी येथील सिद्धगिरी मठ व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सामुदायिक सूर्यनमस्कार महायज्ञ कार्यक्रम रविवारी (दि.२) सकाळी झाला.

सामुदायिक सूर्यनमस्कार महायज्ञात सुमारे ५०० हून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनी, नागरिक व योगसाधकांनी सहभाग घेतला. 'आयुष' मंत्रालय समितीचे सदस्य डॉ. सूर्यकिरण वाघ यांनी योग, सूर्यनमस्कार व आयुर्वेद यांचे महत्त्व व आजच्या मानवी जीवनात असणारी गरज याविषयी मार्गदर्शन केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सामुदायिक सूर्यनमस्कार यज्ञात सहभागी झालेले विद्यार्थी, योगसाधक. (छाया : नाज ट्रेनर)**

योगशिक्षक दत्ता पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कौशिक पाध्ये यांच्या वंदे मातरम् गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी वीणा मालदीकर, प्रीती चव्हाण, डॉ. श्वेता पाटील, उज्ज्वला डफळे, उदय घाटे, प्रज्योत जोशी आदी उपस्थित होते. दरम्यान, शहरातील शाळा, महाविद्यालयांमध्येदेखील सामुदायिक सूर्यनमस्कार कार्यक्रम झाला.

# 'शिव सूर्यनमस्कार महायज्ञा'ला प्रतिसाद

## शिवाजी विद्यापीटात ५०० हून अधिक योगसाधकांचा सहभाग : डॉ. वाघ यांचे मार्गदर्शन

प्रतिनिधी
कोल्हापूर

रथसप्तमी व जागतिक सूर्यनमस्कार दिनाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, योग विद्याधाम, पतंजली योग विद्यापीठ, कणेरी येथील सिद्धगिरी मठ आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिव सूर्यनमस्कार महायज्ञ' या कार्यक्रमाचे विद्यापीठातील क्रिडांगणावर आयोजन करण्यात आले होते. या सामुदायिक सूर्यनमस्कार महायज्ञात सुमारे ५०० हून अधिक विद्यार्थी–विद्यार्थिनी, नागरिक व योगसाधकांनी सहभाग नोंदवला.

आयुष मंत्रालय समिती सदस्य आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कोल्हापूर शहर संघचालक डॉ. सूर्यकिरण वाघ यांनी योग, सूर्यनमस्कार आणि आयुर्वेद यांचे महत्व सांगितले. सूर्यनमस्काराची मानवी जीवनात असणारी गरज याविषयी मार्गदर्शन केले. यानंतर सूर्यमंत्रोच्चारासोबत सूर्यनमस्काराचे सामुदायिक प्रात्यक्षिक आणि निसर्गध्यान करण्यात आले. या प्रत्यक्षिकाचे सूत्रसंचालन योगशिक्षक दत्ता पाटील यांनी केले. प्रास्ताविक आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या समन्वयक सुमन बुवा यांनी केले. कौशिक पाध्ये यांच्या वंदे मातरम् गायनाने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमासाठी वीणा मालदीकर, प्रीती चव्हाण, डॉ. श्वेता पाटील, टिकेकर, उज्वला डफळे, रमेश धाकरस, प्रकाश पाटील, चंद्रशेखर खापणे, सूरज पाटील, उदय घाटे प्रज्योत जोशीं या योगशिक्षकांचे सहकार्य लाभले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित 'शिव सूर्यनमस्कार महायज्ञात' सूर्यनमस्कार घालताना विद्यापीठातील विद्यार्थी, कर्मचारी व परिसरातील नागरिक.**



**कोल्हापूर : आनंद ग्रंथोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. पी. एस. पाटील. सोबत डॉ. व्ही. एम हिलगे, डॉ. बाबू झकेरीया आदी. डी. टी. विचारे, प्रदीप वायचळ प्रा. ए. आर. कुलकर्णी.**

# नॅनोटेक्नॉलॉजीमुळे जगणे सुसह्य

प्रतिनिधी
कोल्हापूर

आधुनिक युगात प्रत्येक माणसाला कमी मोबदल्यात आधुनिक सुखसुविधांची गरज भासते आहे. या अपेक्षित गोष्टी नॅनोटेक्नॉलॉजिक वापरामुळे शक्य होईल, असा आशावाद डॉ. पी. एस. पाटील यांनी व्यक्त केला. सायबरचे संस्थापक कै. डॉ. ए.डी. शिंदे यांच्या १० पुण्यस्मरण निमित्त आयोजित आनंद ग्रंथोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त डॉ. व्ही. एम. हिलगे होते.

डॉ. पाटील म्हणाले, सध्या जगभरात विशेष करून विकसित देशामध्ये मोठ्या प्रमाणात नॅनोटेक्नॉलॉजी आधारित संशोधनावरती मोठ्या प्रमाणात खर्च व गुंतवणूक केली जात असून बदलत्या काळानुरूप तंत्रज्ञान विकसित करण्यावर त्यांचा भर आहे ते म्हणाले, भारतात देखील या टेक्नॉलॉजिच्या वापरास व संशोधनास गती मिळत असून विद्यापीठात देखील मोठ्या प्रमाणात काम चालू आहे. प्रास्ताविक डॉ. कृष्णात चौगले यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सुरेश आपटे यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. अजय शिंदे यांनी केले. यावेळी सायबरचे संचालक डॉ. प्रदीप वायचळ सुनील शिंदे आदी उपस्थित होते.

**डॉ. पी. एस. पाटील : सायबरमध्ये आनंद ग्रंथोत्सव प्रदर्शन**


# शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पती शास्त्र विभागाची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल

**कोल्हापूर ■ राजेंद्र मकोटे**

शिवाजी विद्यापीठाच्या विविध विभागांनी संशोधनासह प्रयोगशील उपक्रम यशस्वीरित्या राबवल्याने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली आहे. यामध्ये वनस्पती शास्त्र विभागाने मोठी आघाडी घेतली आहे. केंद्र सरकारच्या पर्यावरण खात्याच्या विशेष अनुदानातून देशात १५ ठिकाणी लिड बॉटनिकल गार्डनचा संशोधनपर उपक्रम राबवला जातो. यामध्ये महाराष्ट्रात शिवाजी विद्यापीठातच एकमेव ठिकाणी हा प्रकल्प सुरू आहे. यामध्ये मुख्यत्वाने देशविदेशातील विविध वैशिष्ट्यपूर्ण वृक्षांचे रोपन आणि गावठी वृक्षांचे संवर्धन, नवनवीन संकरित फुल वनस्पतींचे संकलन आणि दुर्मिळ होत असलेल्या जंगली वनस्पतींचे पुर्नरोपण (रिप्लांटींग) आणि विविध शासकीय आणि कार्पोरेट उद्योग विश्वातील विविध संस्था संघटनांच्या मागणीनुसार वैशिष्ट्यपूर्ण रोपांचा पुरवठा तसेच देश विदेशातील संशोधक विद्यार्थ्यांना पूरक माहितीसह संदर्भ उपलब्ध करून देणे अशा विविध पैलूंनी हे काम सुरू आहे.

ग्लोबल मव्हिक्टोरिया लिलीफ ते लोकल मसेंच्युरी पामफ वनस्पतींची मांदीयाळी जगात सुप्रसिद्ध असलेल्या अँमेझोन या सूर्यकिरणे जमिनीपर्यंत पोहचू न शकणाऱ्या इतक्या दाट जंगलात वैशिष्ट्यपूर्ण अशा आणि किमान एका लहान बालकाचे १५ किलोपर्यंतचे वजन पेलू शकणाऱ्या इतक्या भक्कम असणारी मव्हिक्टोरिया लिलीफ ही पान वनस्पती ते शंभर वर्षाचे आयुष्यमान असणारे मात्र फक्त एकदाच सर्वात मोठी सफेद फुले आणि बिया देणारे मसेंच्युरी पामफ अशा ग्लोबल ते लोकल ७५० हून अधिक वृक्षांची मांदियाळीच या शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पती शास्त्र विभागाने जपली आहे.

विभागाच्या नजीक असणाऱ्या चार एकरासह एकूण ४२ एकर जागेत या वनस्पती शास्त्र विभागाचा कार्यविस्तार हा विविध वैशिष्ट्यपूर्ण वनस्पतींनी संपन्न झाला आहे. यामध्ये ४० हून अधिक विविध गावठी आणि स्थानिक आंब्याच्या प्रजाती असणाऱ्या अमराईसह देशविदेशातील वैशिष्ट्यपूर्ण पाम गार्डनचा विभाग हा वैशिष्ट्यपूर्ण असा आहे. अनेक देशांची अर्थव्यवस्था सांभाळणाऱ्या पाम तेल आणि त्याच्या पाम वनस्पतींना आगामी काळात सोन्याहून अधिक मोल येणार





आहे. त्यामुळेच पाम ट्री संदर्भाने विविध पैलूने संकलन आणि संशोधन हे लाख मोलाचे झाले आहे. पामच्या ११० हून अधिक विविध जातीच्या वृक्षाचे संकलन आणि संवर्धनही मोठी मोलाची बाजू ठरली आहे. त्यासाठी शिवाजी विद्यापीठातील वनस्पती शास्त्र विभागात अत्यंत पूरक असे वातावरण असल्याने अनेक राज्यातील विद्यार्थी याठिकाणी संशोधनास येत आहेत.

**वृक्षवल्ली विश्वाचे पर्यटन ते संशोधन स्थळ : डॉ. वर्षा जाधव**

आंतरराष्ट्रीय किर्तीचे वनस्पती शास्त्र अभ्यासक माजी विभागप्रमुख डॉ. यादव यांच्यासह अनेकांच्या समर्पित सहभागातून शिवाजी विद्यापीठाचा वनस्पती शास्त्र विभाग हा अधिक संपन्न आणि संशोधनपूरक असा झाला आहे. ही परंपरा विभागप्रमुख म्हणून मला पुढे नेताना विशेष आनंद होत आहे. शालेय विद्यार्थी वर्गासह कुटुंबियांसाठी हे एक माहिती पर्यटनस्थळ तर विद्यार्थी संशोधकांसाठी ही बहुमूल्य अशी कर्मभूमी ठरली आहे. सध्या ९० हून अधिक विद्यार्थी या विभागात पी.एचडी, एम.फील. संशोधन करत असून यामधील ३५ हून अधिक विद्यार्थ्यांना शासकिय तसेच संशोधन संस्थांची शिष्यवृत्ती लाभली आहे. हे शिवाजी विद्यापीठास निश्चितच भूषणावह आहे अशी माहिती नुकत्याच विभागप्रमुख झालेल्या डॉ. वर्षा जाधव यांनी दिली.

मूळच्या अमरावतीच्या असलेल्या डॉ. वर्षा जाधव यांनी मेळघाट जंगल परिसरातील पारंपारिक औषधी वनस्पतीचा स्थानिक आदिवासी आणि वनवासी यांच्याकडून पिढ्यांपिढ्या मौखिक परंपरेत आणि अनुभवाअधारे होणारा वापर याविषयी आपला संशोधन प्रकल्प पूर्ण केला आहे. त्याची वनस्पती शास्त्र संशोधन विश्वात प्रामुख्याने दखल घेण्यात आली आहे.

**३५ वर्षात अनेकांचे योगदान : डॉ.एस.आर. यादव**

केंद्र आणि राज्य सरकारच्या पर्यावरण विभागासह राजीव गांधी सायन्स फौंडेशन आणि विविध पर्यावरण संशोधन क्षेत्रात कार्यरत सरकारी आणि निमसरकारी संस्थांच्या सहकाऱ्यासह गेल्या ३५ वर्षात असंख्य विद्यार्थी संशोधक प्राध्यापक यांचे हा वनस्पती शास्त्र विभाग आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेण्या इतपत संपन्न करण्यासाठी मोलाचे योगदान आहे. तसेच पश्चिम घाटमाथ्यातील विविध जंगलातील स्थानिक नागरिक शेतकरी यांचे सहकार्य ही मोलाचे ठरले आहे, अशी माहिती या विभागाचे निवृत्त विभाग प्रमुख आणि पी.एचडी. गाईड आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीचे वनस्पती तज्ञ डॉ. एस.आर.यादव यांनी सांगत तब्बल ४२ एकर जागेत वनस्पती संपत्ती असणारा हा प्रत्येक विद्यार्थ्याला अभिमान वाटावा असाच विभाग आहे. भविष्यात तो अधिक विकसीत होईल असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

**वृक्ष वल्ली आम्हा सोयरे ते अवघी विठाई माजी**

महाराष्ट्राचे लोकसंचित असणाऱ्या वारकरी संप्रदायात 'वृक्ष वल्ली आम्हा सोयरे ते कांदा मुळा भाजी अवघी विठाई माजी' पर्यंतच्या विविध अभंगांनी अनेक संतांनी निसर्गातील वृक्ष वल्लीचे मानवी जीवनात असलेले मोलाचे स्थान वेळोवेळी अगदीप्रभावीपणे साध्या सोप्या भाषेत व्यक्त केले आहे. आजच्या आधुनिक संदर्भाने याची प्रचिती प्रकर्षाने गेली तीन तपाहून अधिक काळाच्या अनेकांच्या योगदानाने संपन्न झालेल्या या शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पती शास्त्र विभागच्या संपन्नतेने जपलेल्या बाग बगीच्यातून फिरताना प्रकर्षाने येते.

**दृष्टीक्षेपात ...**

केंद्र आणि राज्य सरकारचा अनुदान असलेला एकमेव वनस्पती संशोधन प्रकल्प, ४२ एकर जागेत वृक्ष संपदा, शासकीय तसेच उद्योग विश्वातील संस्थांना वेळोवेळी मदत आणि मार्गदर्शन, आज अखेर विभागातून हजारांच्या संख्येत संशोधक विद्यार्थी.